Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2408II05V12P0010

e-ISSN No. 2394-8426
Special Issue On CPDE Aug'2024
Issue–II(V), Volume–XII

# विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसंदर्भातील शिक्षणाची वार्षिक स्थिती अहवाल (ASER) २०२३ - एक अभ्यास

**संशोधक**
**श्री. जनार्दन कारभारी राऊत**
डी.एड्, एम.एड्,सेट (शिक्षणशास्त्र)

**प्रास्ताविक -**

शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थी गुणवत्ता विकास हा अतिशय महत्त्वाचा भाग आहे. इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंतचे शिक्षण हे प्राथमिक शिक्षण म्हणून ओळखले जाते. इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंतचे शिक्षण हे उच्च प्राथमिक शिक्षण म्हणून ओळखले जाते. इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंतचे शिक्षण हे माध्यमिक शिक्षण म्हणून ओळखले जाते. ६ ते १४ वयोगटातील बालकांना प्राथमिक शिक्षण हे मोफत आणि सक्तीचे आहे. हा नियम महाराष्ट्र राज्यात RTE या कायद्यांतर्गत अंतर्भुत आहे. बालकाच्या औपचारिक शिक्षण प्रक्रियेचा पाया म्हणजे प्राथमिक शिक्षण होय. शिक्षणाचा आकृतिबंध पाहता बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्कानुसार बालवाडी पुर्व प्राथमिक शिक्षण, पहिली ते पाचवी प्राथमिक शिक्षण, सहावी ते आठवी उच्च प्राथमिक शिक्षण आणि नववीते बारावी माध्यमिक शिक्षण असा शिक्षणाचा आकृतिबंध आहे. शिक्षक केंद्रित असलेले प्राथमिक शिक्षण हे आता पूर्णतः विद्यार्थी केंद्रितझाले आहे. पालक आणि विद्यार्थी हे प्राथमिक शिक्षणाबाबत उदासीन दिसून येतात. त्यांची उदासीनता घालविण्यासाठी त्यांचे मन परिवर्तन करणे गरजेचे आहे. त्याचाच एक भाग म्हणून शासनाने विविध योजना राबविल्या. त्यामध्ये मध्यान्ह भोजन योजना, आर्थिक दुर्बल आणि वंचित घटकांसाठी शिष्यवृत्ती योजना, सावित्रीबाई फुलेदत्तक पालक योजना, अस्वच्छ व्यवसाय शिष्यवृत्ती योजना, मोफत पाठयपुस्तक योजना, उपस्थिती भत्ता अशा अनेक योजना राबविण्यात आलेल्या आहेत. शासनाने परिपत्रक काढून प्राथमिक शिक्षण हे मुलभूत अधिकारात समावेशित केलेले आहे. केंद्र शासनाने RTE ॲक्ट २००९ प्रसिद्ध केला आहे. यात ६ ते १४ वयोगटातील मोफत आणि सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम निर्माण करण्यात आला. सदर अधिनियम हा १ एप्रिल २०१० पासून संपूर्ण भारतात लागू केला.

प्राथमिक शिक्षण हा विकासाचा पाया आहे. प्राथमिक शाळेतच मुले मुलभूत कौशल्ये शिकतात. शिकलेल्या कौशल्याचा उपयोग जीवनकार्य व सक्रीय नागरीकत्वासाठी तयार करतात. दर्जेदार शिक्षण हे मुलांना आणि तरूणांना सक्षम बनवते. आरोग्य आणि कल्याणाचे रक्षण करते. आर्थिक समृद्धी, सक्षमता निर्माण करते. उपरोक्त गुणांचा परिपोष करण्यासाठी मूलभूत साक्षरता आणि संख्यात्मकता मोजणी आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पातळीचा अंदाज घेण्यासाठी साधन आवश्यक आहे म्हणूनच असर (Annual Status of Education Report) हा अहवाल भारतीय शिक्षण प्रणालीतील महत्त्वाचे साधन आहे. हा अहवाल ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या वाचन,लेखन आणि मूलभूत गणित कौशल्याची माहिती देतो. या अहवालाचा वापर शैक्षणिक धोरण

निर्मात्यांना शिक्षक आणि पालकांना शिक्षण प्रणालीतील उणिवा ओळखण्यासाठी आणित्या सुधारण्यासाठी, उपाययोजना करण्यासाठी होतो.म्हणूनच Annual Status of Education Report 2023 चा अभ्यास करणे गरजचे आहे.

**असर अहवालाचे उद्देश -**

१. असर अहवालाद्वारे शाळा, शिक्षक, पाठ्यपुस्तके आणि शैक्षणिक साधने यांच्यातील उणीवा ओळखणे.

२. असर अहवालाद्वारे विद्यार्थ्यांचे वाचन, लेखन आणि मूलभूत गणित कोशल्याची पातळी मोजणे.

३. शैक्षणिक धोरण निर्माते आणि शिक्षक शिक्षण प्रणाली सुधारण्यासाठी उपाययोजना करणे.

४. समाजात शिक्षणविषयक जनजागृती करण्यास मदत करणे.

**असर अहवालाचे महत्त्व -**

१. असर अहवाल शिक्षण सुधारण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची ओळख करूनदेतो.

२. हा अहवाल उपाययोजना करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

३. समाजात शिक्षणविषयक चर्चा करणे, शिक्षणविषयक जाणीव निर्माण होण्यास उपयुक्त आहे.

४. पालक आणि शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबद्दल माहिती देतो.

**असर अहवालाच्या माहितीचा वापर—**

**१. शिक्षक प्रशिक्षण—**विद्यार्थ्यांपर्यंत नवनवीन ज्ञान पोहचविणे, त्यासाठी प्रथम शिक्षकांना प्रशिक्षित करणे महत्त्वाचे आहे. प्रशिक्षण दिले जाते परंतु प्रशिक्षणातील तोचतोचपणा घालविण्यासाठी, त्यात सुधारणा करण्यासाठी मार्गदर्शन मिळते.

**२. शैक्षणिकधोरणनिर्मिती—** यातून प्राप्त माहितीच्या आधारे शैक्षणिक धोरण निर्माते शिक्षण प्रणाली सुधारण्यासाठी उपाययोजना करू शकतात.

**३. शाळा सुधारणा -** शाळांच्या भौतिक सुधारणा या विद्यार्थी विकासात मोलाची भुमिका पार पाडतात. त्या सर्व पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी मार्गदर्शन मिळते.

**४. पालकांना मार्गदर्शन-** पालकांना आपल्या पाल्यांची प्रगती समजणे गरजेचे असते. त्यांच्या प्रगतीचा आलेख नेहमी चढता असावा यासाठीते प्रयत्नशील असतात.

**५. शिक्षकांना मार्गदर्शन—**शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल माहिती देतो आणि प्रगती सुधारण्यासाठी मार्गदर्शन करण्याचे कार्य असर अहवालातून केल्या जाउ शकतो.

**निष्कर्ष -**

असर हा अहवाल विद्यार्थ्यांची शैक्षणिक पातळी मोजण्याचे एक महत्वपूर्ण साधन आहे. हा अहवाल शिक्षण प्रणालीतील उणीवा ओळखण्यासाठी आणित्या सुधारण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात यासाठी मदत करतो. असर अहवालातील माहितीचा वापर करून शिक्षणधोरण निर्माते, शिक्षक आणि पालक मिळून भारतीय शिक्षण प्रणालीला अधिक प्रभावी बनवू शकतात.

१. १४-१८ वर्षे वयोगटातील ८६.८० टक्के मुले शैक्षणिक संस्थेत नोंदणीकृत आहे.

२. १४ वर्षाच्या मुलांपैकी ३.९० टक्के आणि १८ वर्षाच्या मुलांपैकी ३२.६० टक्के मुले नोंदणीकृत नाही.

३. १४- १८ वयोगटातील सुमारे २५ टक्के मुले अजूनही प्रादेशिक भाषेतील मजकूर अस्खलितपणे वाचू शकत नाही.

**शिफारशी -**

१. केंद्र आणि राज्याचे अनुदान ग्रामपंचायत निहाय आणि स्थानिक स्वराज्य संस्थानुसार एकत्र केलेज ावे.

२. केंद्र आणि राज्य सरकार हे १९७६ पासून शिक्षण हा समवर्ती सुचीतील विषय असल्याने दोहोंचाही संसासधनातील वाटा समान उचलायला पाहीजे.

३. विद्यार्थी गुणवत्ता वाढीसंदर्भात शालेय स्तरावर पालकांशी नियमित संवाद असणे गरजेचे आहे.

४. गावामध्ये सार्वजनिक ग्रंथालये विकसित करणे गरजेचे आहे. यामुळे गावातील विद्यार्थी अभ्यास करू शकतील आणि विद्यार्थी गुणवत्ता वाढ होईल.

५. शालेय पातळीवरील अपूर्ण भौतिक सुविधा पूर्ण करण्यासाठी शाळा जो निधी मागणी करेल तो त्यांना पुरविण्यात यावा.

**संदर्भग्रंथ -**

१. बापट भा. गो. (१९७७) शैक्षणिक संशोधन पुणे- नुतन प्रकाशन

२. भिंताडे वि.रा. (२००३) शैक्षणिक संशोधन पद्धती पुणे- नुतन प्रकाशन

३. https://www.asercentre.org

४. अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन वाचन साहित्य मुलभूत संकल्पना (२०२३) - राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य पुणे